# घरकुल

जीव मूक पक्षी
स्वप्न होई भार
पायी धूळ वाट
न दिसे ठाव ॥ १ ॥

आसवांचे डोह
सोसवेना नीज
रात्र का उदास
आभाळ गढूळ ॥ २ ॥

संपेना ती वाट
दिशा सैरभैर
कुणी पाहते रे
उंबऱ्यात वाट ॥ ३ ॥

उतरतीस छाया
दिस भाकणूक
उगवतीस सावल्या
सांज ओंजळीत ॥ ४ ॥

होता संध्याकाळ
भासे रिक्त सर्व
घरट्यास येता
सुरु नवे पर्व ॥ ५ ॥

उनपाऊस खेळ
श्रावण संसार
सोबतीला घरकुल
मायेची पांघर ॥ ६ ॥

© सपु - सचिन पु. कुलकर्णी